# धनु राशीफ़ळ ( Dhanu Rashiphal )



धनु राशीफ़ळ ( Dhanu Rashiphal )

**(9) धनु-**

धनु ही राशीचक्रातील ९ वी रास असून गुरु हा अधिपती आहे. या राशीमधे मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा चे १ ले चरण ही नक्षत्रे येतात. ही अग्नी, स्थिर, उभय, सकारात्मक, पुरुष, गरम, कोरडी, उभय शरीर, दीर्घ उदीत राशी आहे. धनु मधे कोणताही ग्रह उच्च वा नीच नसतो. बुध या राशीमधे कमजोर असतो. सुर्य, चंद्र, मंगळ धनु मधे मित्र घरी स्थित मानले जातात. शनी, शुक्र, बुध या राशीमधे शत्रू घरी स्थित मानले जातात. धनु राशीव्दारा एक मार्ग दोन कामे दाखवली जातात. गुरु स्वामी असल्याने कोनताही आजार वा अपघात झाला तर जातकाचे त्यातुन रक्षण होईल. गुरुच्या अनुकुल द्दष्टिचे तात्पर्य की जातकास दैवी सहाय्य प्राप्त होईल. गुरु जर बुध चे बरोबर असेल तर कोणीही तुमचे इच्छेविरुद्ध जाणार नाही.

**1. शारिरिक आकृती-** सुविकसित शरीर, उंच, मोठे डोके, उंच व जाड भुवया, लांब नाक, चमक्णारे डोळे, लोभस चेहरा, गौरवपूर्ण द्दष्टि, सुंदर व्यक्ती असू शकतो.

**2. विशेषता-** धनु अग्नी राशि असल्याने तुम्ही द्दढ, साहसी, बलवान, महत्वाकांक्षी व लोभी असाल. तुम्ही कोणत्याही गोष्टीस चांगल्या द्दष्टीकोणाने पहाल. तुम्ही धांदरट होणार नाहीत. तुम्ही अगदी प्रतिकुल परिस्थितीमधे ही डगमगून जाणार नाहीत व परिस्थिती विरुद्ध आत्मविश्वासाने निर्भयपणे लढाल. जेव्हा अडचणी येतात, तेव्हाच तुमची परीक्षा होत असते. अग्निराशी तुम्हाला उत्साह, शक्ती, पौरुष, चैतन्य प्रदान करते. प्रथम राशी असल्याने तुम्ही प्रत्येक बाबतीत गुण अवगुणांचे मुल्यांकन कराल, पूर्ण व गहन विचार कराल आणि मगच निर्णय घ्याल व कामास सुरुवात कराल. तुमची कामाची सुरुवात उशीरा होईल कारण त्यापूर्वी तुम्ही मनन, चिंतन, व योजना बनवली असेल.

अग्नी राशि असल्याने तुम्हास स्वभावत: कोणाच्या आदेशाखाली काम करणे आवडत नाही, तुमची स्वत:ची अशी स्वतंत्र काम करण्याची पद्धत असते व ना ही तुम्ही सतत एका ठिकाणी बसून काम करु शकता.

तुमची इच्छा अनेक बदल घदवण्याची असते. व तुम्हास मुक्त हस्त प्राप्त असेल तर तुम्ही भव्य दिव्य दिसता.

पुरुष राशी असल्याने तुम्ही अधिक विचार करणे, बोलणे, इच्छा असलेली गोष्ट करणे यात संकोचत नाही. तुम्ही स्वत:वर प्रेम करता व या जगात एकटा आलोय या उक्तीप्रमाणे सिद्धांतावर कायम रहाल. तुम्हाला याची पूर्ण जाणीव असते की आपन कधी कधी जे काही काम करतो, त्याचे वाईट परिणाम ही होऊ शकतात. तुम्ही वास्तविकपणे जे काही अनुभव कराल ते बोलून दाखवाल, मग याचा विचार करणार नाही की ईतरांना अशी वाक्ये आवडतील का नाहीअ.

धनु राशी चक्रातील ९ वी राशी असल्याने तुम्ही उच्च शिक्षण घेण्याचा प्रयत्न कराल अथवा परिक्षार्थी न राहता कायम विद्या मिळवत रहाल. तुम्हाला प्रवासाची आवड असेल. तुम्ही विदेशात मैत्री वाढवण्याचा प्रयत्न कराल. शुभ दृष्टी असेल तर तुम्ही उच्च दार्शनिक, सच्चे ईश्वर भक्त होऊ शकता.

गुरु राशी स्वामी असल्याने प्रगल्भ बुद्धी, विश्वास, अध्यात्मिक विकास देतो. न्याय, सहनुभुती, साहस, अतिरिक्त चांगली भावना, प्रेम आहे. तुम्हाला खेळांची आवड असेल.

९ वे व १० वे स्थानाचे अधिपती सूर्य व बुध असल्याने धनु लवकर नवे विचार सनजू शकतात व त्याची तुलना करतात. तुमच्या मधे अंतर्दन्यान शक्ती असू शकते. तुम्हाला एखाद्यावर अन्याय होत आहे दिसले तर त्यास त्याचे गमावलेले परत मिळ्वून देण्यासाठी त्यास मदत कराल.

६ वे स्थान इच्छा वा वासना दर्शवते. ६ वे स्थानाचा शुक्र हा स्वामी असल्याने, पाळीव कुत्रा वा अन्य जनावरांना सांभाळाल. स्त्री, उंची वस्तू, सुगंधी द्रव्ये, शॊपिंग या विषयी ओढा असेल.

११ वे स्थानाचा स्वामी शुक्र असल्याने तुम्हास अनेक मित्र व लाभदाता असतील. तुम्ही भिन्न लिंगी व्यक्तींबरोबर राहने पसंत करता. तुम्ही मित्रता कायम ठेवू शकता व अनेक वर्षे निभावता.

चंद्र ८ वे स्थानाचा अधिपती असल्याने मन कधी कधी अस्थिर वा अस्वस्थ राहू शकते, अविश्वास वाटू लागतो.

लग्न, वा धनु चंद्र रास वा स्थित ग्रह पीडीत असेल तर, अधिकांश रुपाने चांगले असाल पण कधी कधी तुमचा व्यवहार अविवेकी असेल अथवा कुशलतेची कमी होऊ शकेल. तुम्ही असे कार्य करता ज्याची दुसरा काम चांगले असेल तरी प्रशंसा करत नाही. वाढवून सांगणे वा वायफ़ळ बोलत राहणे हा अवगुण असेल. तुम्ही अनेक पोकळ आश्वासने देत रहाल. विचार मांडताना इतरांचा अनादर करतील. आई वडील, भाऊ यांचे बाबत सतत काही ना काही तक्रार करत राहतील.

3. कमजोरी- लोभावर अंकुश ठेवा. रुप, स्पर्शाचा मोह टाळा. क्रोध टाळा.

**4. धन व संपत्ती-** २ रे स्थानाचा स्वामी शनी असल्याने तुम्ही उशीरा अथवा धीम्या गतीने धनसंचय करता. धनसंपत्ती मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागेल. राशी स्वामी गुरु असला तरी २ रे स्थानाचा स्वामी शनी

आहे तेव्हा वेळ पडली तर कोणत्याही मार्गाने पैसे मिळवण्यास संकोच करणार नाही, अथवा पैसा मिळवून देणारे कोणतेही काम हलके वा उत्तम असला विचार करणार नाहीत.

**5. नोकरी व्यवसाय-** राशी स्वामी गुरु असल्याने तुम्ही शिक्षक, व्याख्याता, बैंक वा आर्थिक, धर्मिक संस्थेमधे, समुपदेशक ई संबंधित नोकरी व्यवसाय करु शकता.

बुध दशमेश असल्याने हे दर्शवतो की तुम्ही संपादन, प्रकाशन, जाहिरात प्रतिनिधी, मिडीया, माहिती तंत्रद्न्यान, सिव्हील अथवा बांधकाम संबंधी प्रोडक्टस, विदेशी दुतावास, ई. संबंधित नोकरी व्यवसाय करु शकता.

धनु राशीमधे स्थित ग्रह जर २, ६, १० स्थानाशी संबंधित असेल तर खाण, परिवहन व इंजिनियरिंग संबंधित काम करु शकतो.

मंगळ पंचमेश व व्दादशेश असल्याने सट्टा वा जुगार तुम्हास लाभदायक नाही. ज्या व्यक्तीच्या पूर्वाषाढा नक्षत्रामधे १, २, ३, ६, ११ स्थानाचा स्वामी स्थित असेल तर ते विनाश्रम श्रीमंत होऊ शकतात व लाभ प्राप्त करु शकतात.

**6. आरोग्य-** धनु राशी जांघ, कुल्ले, कंबर, कमरेच्या मागिल रक्त नलिका दर्शवतो. त्यामुळे कुल्लांवर गाठ, सांधे सुजणे, कंबर दुखणे, मसल्स या भागातील  हाडे दुखणे, वात रोग फ़ुप्फ़ुस ई, संबंधित कष्ट होतात. धनु मधे मंगळ व शनी असेल तर हाडामधे फ्रैक्चर, जांघे मधे फोड, ई साठी शल्य चिकित्सेची गरज पडते. धनु राशित गुरु स्थित असल्यास वात, फ़ुप्फ़ुस, फ़ीटस, ई. संबंधी त्रास होऊ शकतो. धनू पूर्वाषाढा मधे गुरु असल्यास मधुमेह होऊ शकतो. शनी मुळे कुल्ल्ह्यावर घाव, क्षय, जुना फ़ुप्फ़ुसाचा रोग, दमा ई त्रास उदभवू शकतात. चंद्रामुळे फ़ुप्फ़ुसावर सूज, न्युमोनिया, मधुमेह होऊ शकतो. सूर्यामुळे नेत्रहीनता, व कमजोरी दर्शवतो. शुक्र गाठ उत्पन्न करतो. बुध उचकी, दमा ई. धनुसाठी बुध राजयोगाधिपती ग्रह असला तरी ७ वे स्थानाचा म्हणजेच बाधक व मारक स्थानाचा अधिपती असल्याने प्राणघातक आजार निर्माण करतो.

**7. मित्र व परिवार-** तुमचे नातेवाईकांशी संबंध बेताचेच असतात. तुम्ही विभिन्न लिंगी व्यक्तीबाबत उदार असाल व त्यांचेशी मित्रवत रहाल. कोणाशीही मैत्री करणे तुमच्या करता कठीण नाही. तुमचे अनुभवाने हे समजाल की तुमची मैत्री होण्यापूर्वी वाद होतील व नंतर तुम्ही कायमचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित कराल. तुम्ही तुमच्या मुलांवर अधिक खर्च कराल. ज्यांना संतती नसेल ते शिक्षण संस्था, मंदीराचा जीर्णोद्धार ई गोष्टींवर खर्च कराल.  इतरांकरता कृपाळू रहाल, पण नातेवाईकांशी जपून व्यवहार कराल. लग्नेश व चतुर्थेश गुरु असल्याने तुम्हाला घरी स्वतंत्रता वा प्रायव्हसी अशी मिळणार नाही. अशा प्रकारे धनु व मिथुन राशीचे लोक मित्रता करतात. कारण ११ वे स्थान मित्र दाखवतो, ६ वे स्थान वाद दाखवतो. व धनु राशीस शुक्र ६, ११ चा व मिथुन राशिस मंगळ ६, ११ चा स्वामी आहे. त्यामुळे त्यांचे दशेत हे अनुभव येतील. तुमचे मित्र तुम्हास स्थायी रुपाने पसंत करतील. तुमचे गोड स्मित हास्य व तेज स्वभाव तुम्हास भरपूर मित्र देतील. ज्या लोकांचा जन्म शुक्रवारी अथवा वृषभ, तुळ लग्न मधे असतो तो भरणी, पूर्वा फ़ाल्गुनी अथवा अथवा पूर्वाषाढा नक्षत्रांमधे असेल तर ते चांगले मित्र असतील व ज्यांचा जन्म हस्त नक्षत्री असेल ते कळत नकळत तुमच्या बदनामीस कारणीभूत होतील, कारण अष्टमेष दशम स्थानामधे अष्टमेष च्या नक्षत्रमधे असेल.

**8. प्रेम-** पंचम स्थानाचा स्वामी मंगळ असल्याने प्रेमात उत्कटता, आकर्षण व पुढाकार दाखवतो. मंगळ व्दादशेश पण असल्याने. लांबच्या प्रवासात, अनोळखी ठिकाणी, सतत च्या सहवासाने आकर्षण वाढून प्रेम जमू शकते. प्रेमात तुम्ही आक्रमक असू शकता व पुढाकार घ्याल. पण मनासारखे न झाल्यास तुम्ही फ़ार क्रोधी व्हाल, १२ स्थानचे स्व्मी मुळे असफ़ल होण्याची संभावना आहे. तुम्ही वारेमाप खर्च कराल.

**9. वैवाहिक-** धनु जातकाच्या पत्नीने फ़ार बुद्धिमान व कुशल असायला हवी, कारण तुमचा स्वभाव शीघ्रकोपी असतो व ती हे समजून घेणारी हवी की राग थोडावेळच राहील. ती कुशलतापूर्वक व्यवहार करेल व वैवाहिक आयुष्य आनंदी व्यतीत करेल. धनु व्यक्ती, खेळ, सोसायटी, क्लब ई चा शौकीन असतो, व त्यासाठी वेळ देतो, त्यामुळे असे भासेल की यांना पारिवारीक जॊवन कमी महत्वपूर्ण आहे. त्यांच्या आयुष्यात प्रगल्भता उशीरा आल्याने त्यांचे पत्नीसाठी तो समयोचित व सरळ स्वभावाचा माणूस भासतो. जर एखादी व्यक्ती धनू जातका मुलीशी विवाह करेल, तर ती व्यक्ती भाग्यवान असेल. एक व्यक्ती आपल्या पत्नीपासून जी काही अपेक्षा करेल ते सर्व काही तिच्यामधे मिळेल. ती कधीच पतीच्या कामामधे अडथळे निर्माण करणार नाही व पतीने विचारल्याशिवाय काही सल्ला ही देणार नाही. आपल्या पतीस प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे मदत करत राहील. ती शांत, चतुर, कुशल व विचारी असेल. तिला कधी वाटेल की आपला पती चुकीच्या मार्गाचर चालला आहे तरी त्यास ती अतिशय हळुवार पणे ही गोष्ट लक्षात आणून देईल.

२, ७, ११ वे स्थान विवाह्पूरक स्थाने आहेत. २ रे चा स्वामी शनी, ७ वे चा बुध व ११ वे चा शुक्र स्वामी आहे. हे तीनही ग्रह एकमेकांचे मित्र आहेत त्यामुळे चांगले स्थितीत असता व मंगळाची अशुभ दृष्टी नसता, जोडीदार अत्यंत विश्वसनीय, स्वामीभक्त कर्तव्यपरायण, प्रसन्नचित्त व घर प्रसन्न ठेवणारी, असेल. पण मंगळाने २ व ११ चे स्वामी ना पीडीत असेल तर एकपेक्षा अधिक संबंध ठेवणारा व संभावना असणारा जोडीदार लाभेल.

**10. संतती-** २, ५, ११ संतती दर्शक स्थाने आहेत. शनी, मंगळ, शुक्र यांचे स्वामी असून तुमची मुले छोटी असतील तेव्हा, तेव्हा त्यांना जवळ घेणार नाहीत व जसजशी मुले मोठी होतील तसे तुम्ही त्यांचे कडे जास्तीचे लक्ष पुरवाल. त्यांचे व्यवहार, गतिविधी मधे शंका व सल्ला ई मार्गे नाक खुपसणे थांबवले पाहीजे. जर तुम्ही त्यांचे स्वतंत्रतेमधे बाधा आणलीत तर ते अधिक हट्टी होतील व मग तुम्ही त्यांना सुधारु शकणार नाही. आपल्या मुलांबरोबर नेहमी कुशलतेने व्यवहार करा.

**11. भाग्य दिवस-** सोमवार दु:ख व कष्ट्दायक आहे. मंगळवार व्यर्थ खर्च व नुकसान दर्शवतो. बुधवारी करार करण्यासाठी शुभ, गुरुवार परीक्षेत सफ़लता देतो. शुक्रवारी सट्टा, निवडणूक, कोर्ट कचेरी साठी लाभदायक ठरेल. शनीवार हळ्हळू द्दढतापूर्वक उन्नती व दुसरेंना सहाय्यता देतो. रविवार सुखदायक व समृद्धीदायक आहे. दीर्घ यात्रा करा. मंगळवार, बुधवार, शुक्रवार शांती, हवन, प्रार्थना करण्यास चांगला.

**12. भाग्य रंग-** पांढरा, हिरवा, संत्री व हलका नीळा शुभ, लाल रंग अशुभ

12- **भाग्य रत्न-** हिरा, पाचू शुभ माणिक अशुभ

**13- भाग्यशाली अंक-** ६ ५ ३ ८ शुभ २, ७, ९ अशुभ

-ज्योतिषमित्रमिलिंद (७०५८११५९४७) Whatsapp only

For More info : Visit : jyotishmitramilnd.in